CR1974052022

मुंबईचा तुकडे पाडण्यास प्रतिबंध व जमीन
एकत्रीकरण कायदा १९४७ खाली विक्रीस
परवानगी देण्यास विलंब होण्याबाबत

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
परिपत्रक क्र. एल् ए क्यू सी ओ एन्. ११६९/२७०७२७-व,
सचिवालय, मुंबई-३२ दिनांक २० मे १९७४

परिपत्रक

जमीन एकत्रीकरण योजना कार्यान्वित झाल्यानंतर, जमीनीच्या हस्तांतराचे (खरेदी, विक्री, अदलबदल, देणगी इत्यादि) व्यवहार, जमीन एकत्रीकरण कायदा कलम ३१(अ) व (ब) व त्याखालील नियम २७ यास अनुसरुन आयुक्त अगर जिल्हाधिकारी यांचे पूर्व संमतीने पूर्ण करावे लागतात. तुकडेबंदी कायद्याखाली जमिनीची विक्री करणाऱ्या जमिनीधारकांनी आयुक्त अगर जिल्हाधिकारी यांचेकडे अर्ज केल्यावर त्या अर्जावर आयुक्त अगर जिल्हाधिकारी यांनी अर्ज त्यांचे कार्यालयामध्ये पोचल्याच्या दिवसापासून ३ महिन्यांचे आंत जरूर ती परवानगी द्यावी अगर योग्य ती कार्यवाही त्या कालावधीमध्ये करण्यात यावी अशा सूचना शासनाने शासकीय परिपत्रक महसूल व वन विभाग सम क्रमांक दिनांक २२-१-१९७० अन्वये देण्यात आल्या होत्या. त्या सूचनांचे कसोशीने पालन करण्याची विनंती आयुक्त व जिल्हाधिकारी यांना करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सही/-
अवर सचिव,
महसूल व वन विभाग.

प्रत :- जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमि अभिलेख, पुणे
------- क्रमांक कान/एल् आर. १४
पुणे, दिनांक ३०/५/७४

प्रतिलिपी :- उपसंचालक, भूमि अभिलेख (सर्व) एकत्रीकरण अधिकारी (सर्व) यांजकडे सहाय्यक एकत्रीकरण अधिकारी यांना लागणाऱ्या प्रतींसह माहितीसाठी व आवश्यक पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित.

जमाबंदी आयुक्त आणि संचालक,
भूमि अभिलेख (म.रा.) पुणे यांचेकरिता.

नारा९५